**महसूल व वन विभाग (खुद्द) च्या आस्थापनेवर सह सचिव (धोरण) हे पद निर्माण करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- R&FD-५०११(११)/१/२०२६-MRF(DESK-ADM-०१)/१६३९९०७,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-३० जूलै, २०२६.

**प्रस्तावना-**

महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक ओएफएम-२०१६/प्र.क्र.६२४/ई, दि.३०/०३/२०२२ अन्वये महसुल व वन विभाग (खुद्द) साठी पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयात नमुद केल्यानुसार वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-पदनि-०६१७/प्र.क्र.०८/विसु-०१, दि.२९ जून २०१७ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे विभागातील सर्व पदांचा आढावा घेण्यात येऊन विभागातील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजूरी प्राप्त झाली आहे. यामध्ये एकूण ५२१ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. यानुसार महसुल व वन विभाग (खुद्द) साठी सह सचिव (वेतनश्रेणी एस-२७-११८५००-२१४१००)/उप सचिव (वेतनश्रेणी एस-२५-७८८००-२०९२००) संवर्गातील **एकुण १६ पदे** मंजुर आहेत.

महाराष्ट्र शासनामधील महसूल विभाग हा अत्यंत महत्त्वाचा विभाग असून, या विभागामार्फत जमीन विषयक धोरणे, खनिज विषयक बाबी, मुद्रांक शुल्क तसेच भूमि अभिलेखाशी संबंधित विविध उपक्रम व कार्यान्वयन प्रक्रिया सुरू आहेत. सदर विषयांवर सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.सदर धोरणाचे प्रभावी समन्वयन, अंमलबजावणी तसेच क्षेत्रीय स्तरावरील सर्व यंत्रणांशी समन्वय साधण्यासाठी भारतीय प्रशासन सेवेतील "सह सचिव" दर्जाचा अधिकारी असणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी महसुल व वन विभागाच्या आकृतीबंधात **सह सचिव (धोरण)** हे नवीन पद निर्माण करण्यासाठी मा.मंत्रीमंडळाच्या दि.२५/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयास अनुसरुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय-**

महसुल विभागाची विशिष्ट गरज ओळखून महसुल विभाग (खुद्द) च्या आकृतीबंधात **"सह सचिव (धोरण)"** (**वेतनश्रेणी एस-२७:११८५००-२१४१००**) हे नवीन पद निर्माण करण्यात येत आहे. सदर पदावर भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**०२.** सदर शासन निर्णय हा सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने, वित्त विभाग अनौ.सं.क्र.१८८/२०२६, दि.२१/०७/२०२६ द्वारे प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**०३.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०७३०१७२२२२४०४८ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47D160717AE29C2D2661B5275D8B9B4CFAE93893BE65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2026.07.30 17:23:03 +05'30'

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत :-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
५. मा.मंत्री (महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
६. मा.राज्य मंत्री (महसुल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
१०. अपर मुख्य सचिव (महसुल),महसुल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
११. निवडनस्ती, कार्यासन प्रशा-०१.